**भारतीय रिझर्व बँक**
**चलन नियंत्रक विभाग**
**मध्यवर्ती कार्यालय मुंबई - ४०० ००१**

नोव्हेंबर १३, २००१

ए.पी. (डीआयआर मालिका) परिपत्रक क्र. ११
ए.पी. (एफएल मालिका) परिपत्रक क्र. १

प्रति,
विदेशी चलनाचे सर्व अधिकृत डिलर्स
माननीय महोदय/महोदया

**विदेश प्रवासासाठी विदेशी चलनाचे विमोचन - चलनाचे घटक**

अधिकृत डिलर तसेच फुलफ्लेजड मनी चेंजर्स याना इराक, लिबिया, इस्लामिक रिपब्लिक ऑफ इराण, रशियन फेडरेशन आणि स्वतंत्र राष्ट्रांच्या राष्ट्रकूलाच्या प्रजासत्ताकाव्यतिरिक्त अन्य देशात जाणाऱ्या प्रवाशांना युएस डॉलर ५०० किंवा त्याच्या सममूल्य पर्यंतच्या चलनी नोटा आणि नाण्यांच्या स्वरूपातील विदेशी चलन विकण्यास परवानगी देण्यात आली आहे. आता या देशात जाणाऱ्या प्रवाशांसाठी ही मर्यादा रिझर्व बँकेच्या पूर्वानुमतिविना युएस डॉलर २००० (युएस डॉलर दोन हजार मात्र) पर्यंत वाढविण्याचे ठरविण्यात आले आहे. अधिकृत डिलर आणि फुलफ्लेजड मनी चेंजर्सनी त्याप्रमाणे प्रवाशाना देण्यात येणाऱ्या एकूण विदेशी चलनापैकी युएस डॉलर २००० किंवा तिच्या सममूल्य विदेशी चलन नोटा आणि नाण्यांच्या स्वरुपात विकाव्यात.
२. अधिकृत व्यक्तिनी संबांधित घटकांच्या नजरेला या परिपत्रकातील माहिती आणून द्यावी.
३. या परिपत्रकातील आदेश विदेशी विनिमय व्यवस्थापन अधिनियम, १९९९ (१९९९ चा ४२) च्या कलम १०(४) आणि कलम ११(१) अधीन निर्गमित करण्यात आले आहेत.

आपला विश्वासू,
**ग्रेस कोशी**
मुख्य महाव्यवस्थापक